लोकमत

# ग्रामीण भागासाठी विद्यापीठाचा आग्रह

## बृहत आराखड्यासाठी सोमवारपर्यंत मुदत

संदीप आडनाईक
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील भागात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षण पोहोचले पाहिजे, या हेतूने तयार होत असलेल्या पंचवार्षिक बृहत आराखड्यात यावर्षी प्रथमच ग्रामीण भागाचा विचार करण्यात येत आहे. यासाठी जास्तीत जास्त ग्रामीण भागातील महाविद्यालयांची मागणी विद्यापीठाच्या बृहत आराखड्यात होण्याची गरज आहे. सोमवार, दि. १० एप्रिलपर्यंत विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील लिंकवर ग्रामीण भागातील महाविद्यालयांची मागणी नोंदविण्याचे आवाहन शिवाजी विद्यापीठाने केले आहे.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील व्यावसायिक आणि कौशल्याधारित अभ्यासक्रमांच्या तब्बल १९७ नव्या महाविद्यालयांची मागणी ६ एप्रिलपर्यंत नोंदवल्या आहेत. मात्र यात ग्रामीण भागातील आणि महिलांशी संबंधित संस्थांचे प्रमाण अल्प आहे. विद्यापीठाच्या या पंचवार्षिक बृहत आराखड्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त महाविद्यालयांची मागणी ग्रामीण भागातून आल्यास त्याचा फायदा कोणत्याही संस्थेला, व्यक्तीला होणार आहे. यावेळी सर्व घटक यात सहभागी होत असल्यामुळे त्यांच्या सूचनांचा समावेश या आराखड्यात होणार आहे. यासाठी कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि बृहत आराखड्याच्या उपसमितीचे अध्यक्ष सिद्धार्थ शिंदे यांनी आवाहन केले आहे.

### महाविद्यालयांचे व्यस्त प्रमाण

| | | | |
|---|---|---|---|
| आजरा | २ | कागल | ७ |
| चंदगड | ५ | करवीर | १३ |
| गगनबावडा | २ | पन्हाळा | ११ |
| भुदरगड | २ | राधानगरी | ५ |
| गडहिंग्लज | १३ | शाहूवाडी | ५ |
| हातकणंगले | २० | शिरोळ | ८ |
| कोल्हापूर शहर | २५ | | |

ग्रामीण भागातील महाविद्यालयांची संख्या नगण्य आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात तसेच किलोमीटरच्या प्रमाणातील याचे व्यस्त प्रमाण पाहून यापुढे ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. त्यामुळे सर्वांनी गुगल मिटवरील प्रश्नावलीद्वारे सूचना नोंदवाव्यात.

- सिद्धार्थ शिंदे,
उपाध्यक्ष, पंचवार्षिक बृहत आराखडा समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.